दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • शुक्रवार दि.१३ फेब्रुवारी २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १६९ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Friday 13 Feburary 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 169 • Pages 4 • Rate 4 Rs

### रोहितची अस्वस्थता स्वाभाविक–सुप्रिया सुळे

**मुंबई–**अजित पवार यांच्या निधनानंतर कुटुंबीयांवर भावनिक आघात झाला असताना, खासदार सुप्रिया सुळे यांनी माध्यमांशी बोलताना मनातील भावना व्यक्त केल्या. त्यांनी सांगितले की, शरद पवारांची प्रकृती आता स्थिर आणि चांगली आहे, तसेच रुग्णालयातील सर्व डॉक्टरांचे त्यांनी आभार मानले. आज एकीकडे आनंद आहे, तर दुसरीकडे प्रचंड दुःख आहे. दादांचं वय जाण्याचं नव्हतं. ते आपल्यात नाहीत, यावर अजूनही विश्वास बसत नाही, असे त्या म्हणाल्या. सुनेत्रा पवारांवर आता मोठी जबाबदारी आल्याचेही त्यांनी नमूद केले.रोहित पवार यांनी १२ तारखेला काही खुलासे करणार असल्याच्या चर्चेबाबत विचारले असता, सुप्रिया सुळे यांनी अतिशय संयत प्रतिक्रिया दिली. दादाच राहिले नाहीत, कुणाबद्दल जुनं काय काढायचं? असे त्या म्हणाल्या. त्यांनी पुढे सांगितले की, रोहितची अस्वस्थता स्वाभाविक आहे आणि कुटुंब सध्या कठीण काळातून जात आहे. आम्ही एकमेकांना आधार देत पुढे जात आहोत, असे त्यांनी सांगितले.

# बीड जिल्ह्याच्या विकासासाठी सह्याद्रीवर खलबते

## आरोग्य,रस्ते आणि पर्यटनासाठी कोट्यवधी रुपयांच्या निधीची आ.नमीताताई मुंदडा यांची मागणी

### अंबाजोगाईत इको– टुरिझम आणि नवीन कारागृह,पर्यटन

अंबाजोगाईच्या निसर्ग सौंदर्याला चालना देण्यासाठी तिथे इको– टुरिझम प्रकल्पासाठी निधीची मागणी करण्यात आली आहे,ज्यामुळे स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.सुरक्षा अंतर्गत गृह विभागा अंतर्गत अंबाजोगाई येथे नवीन कारागृहासाठी काळवटी शिवारात ३० एकर जागेवर संरक्षण भिंत उभारण्यासाठी ५ कोटी रुपयांच्या निधीची तातडीने मागणी करण्यात आली.



### नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे

होळ,काळेगाव घाट, सोनीजवळा, बोरिसावरगाव,येवता आणि पाटोदा येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रे सुरू करण्यासाठी प्रस्ताव तातडीने शासनाकडे पाठवण्याची मागणी करण्यात आली.तसेच सासुरा,उमरी,भालगाव, कोरडेवाडी,आरणगाव यासह ११ गावांमध्ये नवीन आरोग्य उपकेंद्रे उभारण्याबाबत ठराव मांडण्यात आला.स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महा विद्यालय व जिल्हा रुग्णालय अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महा विद्यालयासाठी अत्याधुनिक यंत्रसामग्री आणि औषध खरेदीसाठी मोठ्या निधीची तरतूद करण्याची मागणी करण्यात आली.

### अतिवृष्टीने नुकसान झालेल्या पायाभूत सुविधांचे पुनरुज्जीवन

अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील रस्ते,पूल आणि जल संधारण प्रकल्पांचे प्रचंड नुकसान झाले आहे.या कामांच्या दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जल संधारण विभागाने युद्ध पातळीवर निधी उपलब्ध करून द्यावा,अशीभूमिका आ.नमीता मुंदडा यांच्या कडून बैठकीत मांडण्यात आली.प्रमुख उपस्थिती मध्ये ही बैठक बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांच्या अध्यक्षते खाली आणि पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.यावेळी जिल्ह्यातील सर्व प्रमुख लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

दैनिक वादळ वार्ता केज । प्रतिनिधी

मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृह येथे दि.१२ फेब्रुवारी गुरुवारी बीड जिल्हा नियोजनसमितीची अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली.जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या अध्यक्षते खाली झालेल्या या बैठकीत जिल्ह्याचा प्रलंबित विकास आणि विविध लोकहितार्थ कामांसाठी निधीचा महापूर आणण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी लावून धरली.

### बीडच्या आरोग्य यंत्रणेचा होणार कायापालट?

बीड जिल्ह्यातील वाढती लोकसंख्या आणिआरोग्य सुविधांवरील ताण लक्षात घेता,बैठकीत आरोग्य विभागावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले.

# होळ वीज उपकेंद्रात १० एम व्ही ए क्षमतेचे रोहित्र तात्काळ बसवा अन्यथा बेमुदत ठिय्या आंदोलन

### क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांचा महावितरणला इशारा

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील होळ ३३ के.व्ही.विद्युत उप केंद्रातुन होळ,लाडेगाव, दिपेवडगाव,लाडेवडगाव,मुलेगाव ता.केज येथील शेतकऱ्यांना शेती साठी वीज पुरवठा दिला जातो. मात्र सद्यस्थितीत होळ ३३के.व्ही.वीज उपकेंद्रा तुन क्षमतेपेक्षा अधिक वीजेची मागणी असुन वरिल गावातील जवळ पास सर्वच फिडर वरील रोहित्रातुन कमी दाबाने व अनियमितपणे शेतकऱ्यांना तब्बल ३० तास व काही फिडर वर ३६ तासानंतर फक्त ६ तास वीजपुरवठा दिला जात आहे.यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे भिजवणे होत नसून पिके वाळून जात आहेत.या सर्वच गावातील शेतकऱ्यांना उच्च दाबाने दिवसा आठ तास वीज देण्याच्या मागणीसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदिप करपे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या वतीने होळ ३३



के.व्ही.उपकेंद्र कनिष्ठ अभियंता कार्यालयासमोर दि.११ डिसेंबर २०२५ रोजी ठिय्या आंदोलन करण्यात आले होते.तेंव्हा महावितरणअधिकाऱ्यांनी लेखी दिलेल्या लेखी आश्वासनुसार सदर आंदोलनस्थगित करण्यात आले होते या पत्रातील आश्वासनानुसार होळी विद्युत ३३के.व्ही वीज उपकेंद्रात १० एम व्ही ए क्षमतेचे रोहित्र बसवून वीजपुरवठा उच्च दाबाने सर्व कृषि ग्राहकांना पुरवठा करणे आवश्यक होते मात्र अद्यापही रोहित्र न बसवल्याने क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी शुक्रवार दि.२० फेब्रुवारी २०२६ पासुन बेमुदत ठिय्या आंदोलन छेडण्याचा इशारा बीड येथील महावितरणच्या मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री.प्रेमसिंग राजपूत यांना निवेदनाद्वारे बुधवारी दि.११ फेब्रुवारी रोजी प्रत्यक्ष भेटून दिला आहे.

# केज शहरातील जि.प.माध्यमिकशाळेची चार एक्कर जागा हस्तांतरणाचा घेतलेला ठराव तात्काळ रद्द करण्याची भाई मोहन गुंड यांची मागणी

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

केज नगरपंचायत हद्दीतील सर्वे नंबर ७ मधील जिल्हा परिषद शाळेची चार एक्कर जमीन आपण नगर पंचायतला हस्तांतरीत करण्यासाठीचा ठराव आपण घेतलेला आहे तो तात्काळ रद्द करुन,त्या बाबत आपण नगर पंचायतने जेथे कुठे हस्तांतरणाच्या बाबती मध्ये प्रस्ताव करून मागणी केल्या आहेत, तेथे ठराव रद्द केल्या बाबतचे पत्र नगर पंचायत ने संबंधित विभागाला देऊन ठराव रद्द केल्या बाबतचे कळवावे अशी मागणी नगरपंचायतचे मुख्य कार्यकारी अधिकारी,नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड यांच्या कडे शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड यांनी केली आहे.

सदरील शाळा कायमची बंद पडलेली नाही तिथे आज ही प्राथमिक शाळा चालु आहे,माध्यमिक शाळा चालु करण्या संदर्भात सर्व वरीष्ठ पातळी वर पत्र व्यवहार






चालु आहेत.दि.२६ जानेवारीला माजी विद्यार्थ्यांचा मोठा मेळावा संपन्न झाला,मेळाव्यात सर्वांनी शाळा सुरू करण्यासाठी प्रयत्नशील आहेत,येत्या जुन मध्ये शाळा सुरू होणार आहे. केज शहरातील नागरीक या शैक्षणिक चळवळीत सहभागी झाले आहेत, जुन मध्ये शाळा सुरू होणार आहे,त्यामुळे शहरातील लेकरांचे भाविष्य येथे घडणार आहे,नगरपंचायतने घेतलेला जमीन हस्तांतराचा ठराव तात्काळ रद्द करावा अशी विनंती करत ठराव रद्द न केल्यास नगरपंचायत कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनात शेकाप नेते भाई मोहन गुंड यांनी दिला आहे,निवेदनाच्या प्रति बीड जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना ही पाठवण्यात आल्या आहेत.

# ह.भ.प.चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या तीन दिवसीय प्रवचन मालेचे माजलगाव येथे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
माजलगाव । प्रतिनिधी

प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षी देखील श्री संत धुंडा महाराज देगलूरकर सेवा प्रतिष्ठान माजलगाव आणि राजस्थानी सेवा समाज माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने ह.भ.प. गुरुवर्य चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या रसाळ वाणीतून तीन दिवसीय प्रवचन मालेचे आयोजन माजलगाव येथे करण्यात आले आहे.प्रवचन मालेचे हे सोळावे वर्ष आहे.तर प्रवचनाचा विषय हरिपाठ हा असून या अमृतमय प्रवचनाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री संत धुंडा महाराज देगलूरकर सेवा प्रतिष्ठान व राजस्थानी सेवा समाज माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे. फाल्गुन शुद्ध प्रतिपदा ते फाल्गुन शुद्ध तृतीया शके १९४७ अर्थात बुधवार दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ ते शुक्रवार दिनांक २० फेब्रुवारी २०२६ रोजी दररोज सायंकाळी साडेसहा ते साडेआठ या वेळेमध्ये राजस्थानी मंगल कार्यालय माजलगाव येथे श्री संतज्ञानेश्वर



माऊलींचा हरिपाठ या विषयावर प्रवचन मालेचे आयोजन करण्यात आले आहे.तरी सर्व भाविकांनी याचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समिती च्या वतीने करण्यात आले आहे.

# नाव्होली परिसरातील पाण्याचा प्रश्न सुटणार तीन किलोमीटर नदी सरळीकरण व खोलीकरण कामाचा अक्षय मुंदडांच्या हस्ते धडाक्यात शुभारंभ

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील नाव्होली येथील शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी आणणाऱ्याआणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या नदी सरळीकरण व खोलीकरण कामाचा शुभारंभ दि.१२ फेब्रुवारी रोजी गुरुवारी करण्यात आला.या महत्त्वपूर्ण प्रकल्पामुळे परिसरातील जलस्त्रोत पुनरुज्जीवित होणार असून शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.पाणी साठवण क्षमतेत होणार मोठी वाढ नाव्होली ते दैठणा या दरम्यान सुमारे तीन किलोमीटर लांबीच्या नदीपात्राचे काम हाती घेण्यात आले आहे.सद्य स्थितीत नदीपात्रात साचलेला गाळ आणि नागमोडी वळणांमुळे पाण्याचा प्रवाह अडथळा ठरत होता.आता या कामामुळे पाणी साठवण होणार आहे.नदीपात्राची खोली वाढल्याने मोठ्या प्रमाणावर पाणी साठवण होईल.भूजल पातळीत वाढ होऊन जमिनीत पाणी मुरण्याचे प्रमाण वाढून परिसरातीलविहिरी आणि कूपनलिकांच्या पाणी पातळीत लक्षणीय सुधारणा होईल.यामुळे



शेतीला पाणी उपलब्ध होणार आहे.भविष्यात सिंचनासाठी मुबलक पाणी उपलब्ध झाल्याने शेती उत्पादनात वाढ होण्यास मदत होईल.

हा उपक्रम केवळ पाण्यासाठी नसून नाव्होली परिसरातील ग्रामीण विकासाचा एक नवा अध्याय आहे.यामुळे ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी आणि शेतकऱ्यांना पिकांसाठी दीर्घकालीन दिलासा मिळणार आहे.यावेळी लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

या प्रसंगी गावचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि परिसरातील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.सर्वांनी या कामाचे स्वागत करत प्रशासकीय आणि स्थानिक प्रयत्नांचे कौतुक केले.जलसंधारणाच्या या कामामुळे नाव्होली आणि दैठणा परिसराचा कायापालट होणार असून,दुष्काळाशी दोन हात करण्यासाठी हे पाऊल मैलाचा दगड ठरणार आहे असे बोलले जात आहे.

# संपादकीय

## एकत्रिकरणाचं भवितव्य

ज्यांच्या आग्रहाखातर दादा वेगळे झाले, त्या बहुतेक सगळ्या नेत्यांचा दोन्ही पक्षांच्या एकत्रिकरणाला विरोध होता, हे त्यांनाही माहीत होतं. त्यांचा तो विरोध आजही दिसतो आहेच. या विरोधाला काही तात्त्विक, वैचारिक आधार आहे, असं नाही. शुद्ध व्यावहारिक आहे. अजितदादांच्या वारसदारांना याची व्यवस्थित कल्पना आहे.२८जानेवारीच्या सकाळी बारामतीत दुर्दैवी विमान अपघात झाला नसता, त्यात अजितदादा पवार यांचं निधन झालं नसतं, तर आज कदाचित सर्व वृत्तपत्रांत दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकत्रिकरणाच्या बातम्यांचे मथळे असते. 'कदाचित' म्हणण्याचं कारण एवढंच, की दिशा निश्चित होती; पण प्रक्रियेचे तपशील ठरत होते. दोन्ही राष्ट्रवादी एकमेकांविरोधात सर्वोच्च न्यायालयात पोहोचले असल्याने काही तांत्रिक बाबी आडव्या येऊ शकल्या असत्या. शिवाय, राजकीय घडामोडींत कधी कोणते फाटे फुटतील, हे सांगता येत नसतं. त्यामुळे, एखादी गोष्ट प्रत्यक्ष घडत नाही, तोपर्यंत त्याबाबत खात्रीने बोलण्याला काही अर्थ नसतो. 'घड्याळ'वाल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे काही नेते 'अशी काही चर्चा सुरू असल्याचं आम्हाला माहीत नव्हतं. तसं असतं, तर दादा आमच्याशी बोलले असते' असं सुरुवातीला म्हणाले. पण, त्यानंतर संबंधितांकडून चर्चेच्या फेऱ्यांचे अनेक तपशील, चित्रफितीच दाखवल्या गेल्याने या नेत्यांकडून पुन्हा तशा प्रकारचं वक्तव्य झालं नाही. आता उघड झालेल्या एकूण तपशिलावरून अशी चर्चा सुरू होती आणि खुद्द अजितदादाच त्यासाठी आग्रही होते, असं दिसतं. या चर्चेतील खाचाखोचा ते आपल्या पक्षातील सहकाऱ्यांना किती सांगत असतील, हा प्रश्न आहे. कारण, ज्यांच्या आग्रहाखातर दादा वेगळे झाले, त्या बहुतेक सगळ्या नेत्यांचा दोन्ही पक्षांच्या एकत्रिकरणाला विरोध होता, हे त्यांनाही माहीत होतं. त्यांचा तो विरोध आजही दिसतो आहेच. या विरोधाला काही तात्त्विक, वैचारिक आधार आहे, असं नाही. शुद्ध व्यावहारिक आहे. अजितदादांच्या वारसदारांना याची व्यवस्थित कल्पना आहे. सुनेत्रा पवार यांची उपमुख्यमंत्री म्हणून निवड, पदग्रहणापूर्वीचे सोपस्कार, दिल्ली भेटीसाठीचा आग्रह या वारसदारांना समजत नाही, असं नाही. पण, आत्ताच काही भूमिका जाहीर करण्याची गरज नाही. सगळ्यांचं ऐकून, प्रत्येकाची पावलं कुठे पडतात हे नीट समजावून घेऊन मगच आपली भूमिका स्पष्ट करण्याचं त्यांनी ठरवलं असावं. कुठेही काहीही न बोलता सरकारमधील, पक्षातील; अगदी पक्ष संघटनेतील घडी बसवण्याला त्यांनी प्राधान्य दिलेलं दिसतं. आजच्या घडीला हेच धोरण योग्य आहे. अजितदादांचे वारसदार नवखे किंवा अपरिपक्व आहेत, त्यांना आपल्यालाच पुढे घेऊन जायचं आहे, असा समज कोणी करून घेतला असेल, तर त्यांना लवकरच ठेच लागण्याची शक्यता यावरून दिसते. दोन राष्ट्रवादी वेगळ्या झाल्या, तेव्हांही त्याबाबतच्या चर्चा वेगवेगळ्या पातळ्यांवर कितीतरी दिवस सुरू होत्या. तेव्हांही पक्षात आणि पवार कुटुंबात अशा दोन्ही आघाड्यांवर स्वतंत्रपणे बोलणी होत होती. दोन्ही बाजूला अग्रभागी पवार कुटुंबातील व्यक्तीच असल्याने साहजिकच त्यावेळीही 'केवळ पक्षात फूट, की कुटुंबात दरी?' अशा प्रकारच्या चर्चा झाल्या होत्या. भारतीय जनता पक्षाबरोबर जाण्यासाठी जे आग्रही होते, त्यातील प्रत्येकाची त्या आग्रहामागे वेगवेगळी कारणं होती. त्याची चर्चाही त्यानंतर पुष्कळ झाली होती. पण, तो निर्णय घेण्याच्या काळात स्वतः अजितदादा किती तणावात होते, याची कल्पना भारतीय जनता पक्षातील वरिष्ठ नेत्यांसह राजकीय वर्तुळालाही आहे. दोन राष्ट्रवादी स्वतंत्र झाल्यानंतरही सुरुवातीचे काही महिने सोडले, तर नंतर दोन्ही बाजूंनी परस्परांवरचे वार थांबले होते. विधिमंडळाच्या अधिवेशन काळात दोन्ही पक्षांचे नेते आणि आमदार किती समन्वयाने वावरायचे, हे तर जगजाहीर आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत दोन्ही पक्षांनी अनेक ठिकाणी आघाडी करण्याचा निर्णय घेतला होता. राष्ट्रवादीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिल्लीत शहा यांची भेट घेऊन त्यांना त्याची कल्पनाही दिली होती. भाजपसारख्या तगड्या पक्षाच्या युतीत असताना त्यांच्या संमतीशिवाय असा काही निर्णय कोणी पक्ष परस्पर घेईल, हे संभवत नाही. म्हणजे, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने केलेली निवडणूक आघाडी ही भाजपला पूर्ण अवगत होती आणि त्यांची त्याला मूळ संमती होती, असं मानायला जागा आहे. भाजपचं केंद्रीय नेतृत्व राजकीय परिणामांचा विचार केल्याशिवाय आणि एखाद्या राजकीय घडामोडीचं पूर्ण तार्किक चित्र स्पष्ट असल्याशिवाय गाफीलपणे परवानगी देणंही शक्य वाटत नाही. राष्ट्रवादी काँग्रेसमधील घडामोडींची माहिती महायुतीतल्या अन्य पक्षांच्या वरिष्ठ वर्तुळात असणार असा निष्कर्ष यावरूनच काढला जातो आहे. राष्ट्रवादीतल्या नेत्यांनी याही गोष्टीचा विचार उघड वक्तव्य करण्याआधी करायला हवा. अर्थात याविषयी आता कोणी उघड कबुली देण्याचा किंवा दुजोरा देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. कारण, त्या अपघाताने सर्व समीकरणंच बदलून गेली आहेत. एकत्रिकरणाचा विचार करणारे आपापला विचार करताहेत; पण हे एकत्रिकरण ज्या राजकीय चित्राचा भाग होतं, त्या चित्रातल्या अनेक घटकांची आताच्या घडीची गरज, सोय काय आहे, याचा विचार कोणी करतं आहे, असं दिसत नाही. सुनेत्रा पवार यांच्या दिल्ली भेटीतही या विषयावर चर्चा झाल्याचं काही ठिकाणी प्रसिद्ध झालं आहे. त्याचे तपशील एक – दोन दिवसात कळतील. जर चर्चा झालीच असेल, तर बदललेल्या परिस्थितीत भाजपची भूमिका काय आहे, त्यांचा कल कुठे आहे, हे तिथे उपस्थित असलेल्यांना कळलंच असेल. राष्ट्रवादीतले प्रमुख चार–पाच नेते या एकत्रिकरणाला जो विरोध करताहेत, त्याची दखल भाजप कशी घेणार आहे, यावरच या 'चर्चेतल्या एकत्रिकरणा'चं भवितव्य अवलंबून आहे. अजितदादा या एकत्रिकरणाला तयार होते, त्यामागे राजकीय कारणांपेक्षा भावनिक कारणं जास्त होती, असं म्हणतात. ती भावनिक कारणं त्यांच्या वारसांच्या दृष्टीने किती महत्त्वाची ठरतात, हा मुद्दा आहेच. शिवाय, ही प्रक्रिया नेटाने पुढे नेण्याएवढी तीव्र इच्छाशक्ती आता कुणाकडे असण्याचं कारण नाही, ही वस्तुस्थितीही लक्षात घ्यावी लागेल. आधी कुटुंब; मग पक्ष याच क्रमाने ही दुरुस्ती व्हायची तेव्हां होईल.

# ज्ञान,संस्कृती व भारतीय मूल्ये रुजवणारी शाळा म्हणजे विश्वशांती गुरुकुल' पद्मश्री परशुराम गंगावणे यांचे विचार

## एमआयटी विश्वशांती गुरुकुलमध्ये विश्वधर्मी विश्वनाथ सभागृहाचे उद्घाटन

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई | प्रतिनिधी**

आजच्या आधुनिकतेच्या काळात भारतीय ज्ञान-परंपरा व आधुनिक शिक्षणाची सांगड घालणारी आणि विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, संस्कृती व भारतीय मूल्ये रुजवणारी शाळा म्हणजे एमआयटी विश्वशांती गुरुकुल असे विचार पद्मश्री परशुराम गंगावणे यांनी मांडले. उलवेतील एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये नव्याने उभारण्यात आलेल्या विश्वधर्मी विश्वनाथ सभागृहाच्या उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. माईर्स एमआयटी शिक्षण समूहाचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड आणि सौ. उषा विश्वनाथ कराड यांच्या शुभ आशीर्वादाने प्रमुख पाहुणे पद्मश्री परशुराम गंगावणे आणि माईर्स एमआयटीच्या विश्वस्त व महासचिव प्रा. स्वाती कराड चाटे यांच्या हस्ते हा उद्घाटन सोहळा पार पडला. यावेळी पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक राजेंद्र पाटील, सौ. उषा विश्वनाथ कराड, एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या प्रकल्प संचालिका प्रा. प्रभा कासलीवाल, अण्णासाहेब टेकाळे, विश्वशांती गुरुकुल स्कूलच्या मुख्याध्यापिका अंशू सक्सेना, ॲकडेमिक हेड शीतल वर्मा, मार्केटिंग व ऑपरेशन्स हेड प्रा. के.सी. मिश्रा उपस्थित होते.

यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले 'चित्रकथी व कळसूत्री बाहुल्यांसारखे कलाप्रकार प्राचीन काळापासून चालत आलेले असून त्यांचा उद्देश केवळ मनोरंजन नसून समाज प्रबोधनाचेही कार्य या कलेच्या माध्यमातून करण्यात आले आहे.' माईर्स एमआयटी संस्थेच्या विश्वस्त व महासचिव प्रा. स्वाती कराड चाटे यावेळी म्हणाल्या जागतिक दर्जाच्या सुविधा निर्माण करताना मानवी मूल्ये आणि सामाजिक जबाबदारी यांना केंद्रस्थानी ठेवून एमआयटी समूहाचे संस्थापक विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ डी. कराड यांनी आजपर्यंत अनेक वास्तु उभारल्या. नव्याने साकारण्यात आलेले विश्वधर्मी विश्वनाथ सभागृह हे केवळ एक सभागृह नसून त्यांच्या दूरदृष्टीचे प्रतीक आहे. पुढे बोलताना त्या म्हणाल्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच मूल्याधिष्ठित शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि त्यांना सजग, सुसंस्कृत व जबाबदार नागरिक घडवणे हे या शाळेचे प्रमुख ध्येय आहे. हे सभागृह शिक्षण, कला व सांस्कृतिक उपक्रमांसाठी सर्व सुविधांनी सुसज्ज आहे. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये कलागुण विकसित करण्याचा दृष्टीने आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यामध्ये हे सभागृह महत्वपूर्ण भूमिका बजावेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला आहे.



**माईर्स एमआयटी संस्थेच्या विश्वस्त व महासचिव प्रा. स्वाती कराड चाटे**

**विश्वशांती गुरुकुल स्कूलच्या मुख्याध्यापिका अंशू सक्सेना व ॲकडेमिक हेड शीतल वर्मा**

**माईर्स एमआयटी शिक्षण समूहाबद्दल**

भारतातील अग्रगण्य शैक्षणिक समूहांपैकी एक अशा माईर्स एमआयटीची स्थापना विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ डी. कराड यांनी १९८३ साली केली. गेल्या चार दशकांहून अधिक काळ ही संस्था शिक्षण, संशोधन आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून, संस्थेची देशभरात ५ विद्यापीठे आणि ७२ हून अधिक शाळा व महाविद्यालये आहेत. वैद्यकीय, अभियांत्रिकी, डिझाइन, व्यवस्थापन अशा सर्व आस्थापनांमध्ये आणि नर्सरी ते पदव्युत्तर शिक्षणाचे पर्याय उपलब्ध असलेला शिक्षण समूह म्हणून जागतिक स्तरावर ओळखला जातो. शिक्षणाला राष्ट्रनिर्माण आणि विश्वशांतीचे प्रभावी साधन मानून संवेदनशील आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार नागरिक घडवणे हे या समूहाचे मुख्य ध्येय आहे. एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल, उलवे माईर्स एमआयटी समूहाच्या याच दूरदृष्टीपूर्ण विचारसरणीचे प्रतिबिंब आहे.

**एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल, उलवे**

माईर्स एमआयटी शिक्षण संस्थेचे एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल आधुनिक शिक्षण पद्धती आणि भारतीय ज्ञान परंपरेवर आधारित मूल्याधिष्ठित शिक्षणातून सजग आणि संवेदनशील नागरिक घडविण्याचे काम करत आहे. 'एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल'च्या कोथरूड, लोणी काळभोर, सोलापूर, बार्शी, पंढरपूर, उलवे (नवी मुंबई), छ. संभाजीनगर व सांगली या आठ ठिकाणी शाखा आहेत. विज्ञान, आध्यात्म आणि भारतीय संस्कृतीचा सुंदर समन्वय साधत येथे विद्यार्थ्यांच्या शारीरिक, बौद्धिक, भावनिक व आध्यात्मिक विकासावर भर दिला जातो. अनुभवी शिक्षक, अद्यावत शैक्षणिक सुविधा, सुरक्षित व प्रेरणादायी शैक्षणिक वातावरण ही या शाळेची वैशिष्ट्ये आहेत. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच योग, ध्यान, कला, क्रीडा, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम आणि व्यक्तिमत्त्व विकासावर येथे विशेष लक्ष दिले जाते.

# मुंबई महानगरपालिकेत प्रशासक राज संपला; ४४ वर्षांनंतर भाजपचा महापौर-रितू तावडे बिनविरोध, संजय घाडी उपमहापौर

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई | प्रतिनिधी**

मुंबई महानगरपालिकेच्या इतिहासात आज महत्त्वाचा राजकीय टप्पा नोंदवला गेला. तब्बल ४४ वर्षांनंतर भाजपचा महापौर मुंबईला मिळाला असून, भाजप नेत्या रितू तावडे यांची बिनविरोध महापौरपदी निवड झाली. शिवसेना (एकनाथ शिंदे गट)चे संजय शंकर घाडी यांची उपमहापौरपदी निवड झाली. प्रशासक राज संपुष्टात येत महापौर राजची औपचारिक सुरुवात झाली आहे. २२७ सदस्यीय सभागृहात महायुतीकडे स्पष्ट बहुमत असल्याने महापौर निवड अपेक्षितच मानली जात होती. ७ फेब्रुवारी रोजी उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. विरोधी पक्षांनी उमेदवार न दिल्याने विशेष सभेत पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी रितू तावडे यांच्या निवडीची घोषणा केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पदग्रहण सोहळा पार पडला.



**रितू तावडे : भाजपच्या पहिल्या महिला महापौर**

५३ वर्षीय रितू तावडे या घाटकोपर पूर्व मतदारसंघातून तीन वेळा नगरसेविका म्हणून निवडून आल्या आहेत. काँग्रेसमधून राजकारणाची सुरुवात करून त्यांनी २०१२ मध्ये भाजपमध्ये प्रवेश केला. शिक्षण समिती अध्यक्षा म्हणून त्यांनी काम पाहिले असून पाणीटंचाई, करवाढ, फेरीवाले, स्वच्छता या मुद्द्यांवर त्या आक्रमक राहिल्या आहेत. भाजपच्या मुंबईतील पहिल्या महिला महापौर म्हणून त्यांनी नवा राजकीय अध्याय सुरू केला आहे.

**संजय घाडी उपमहापौर**

वॉर्ड क्रमांक ५ (दहिसर-मागाठाणे) येथील ज्येष्ठ नगरसेवक संजय घाडी यांची उपमहापौरपदी निवड झाली. २०२२ मधील शिवसेना फुटीनंतर ते एकनाथ शिंदे गटात सामील झाले. महायुती करारानुसार उपमहापौरपद सव्वा वर्षासाठी त्यांच्या ताब्यात राहणार आहे.

**पहिल्याच दिवशी सभागृहात गोंधळ**

महापौर आणि उपमहापौर यांच्या भाषणादरम्यान सभागृहात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये घोषणाबाजी झाली. काँग्रेसच्या महिला नगरसेवकांना बसायला जागा न दिल्याचा आरोप करण्यात आला. ठाकरेंच्या गटातील नगरसेवकांनी उपमहापौर संजय घाडी यांच्या भाषणाची प्रत फाडून वॉकआऊट केला.किशोरी पेडणेकर यांनी शिंदे गटाच्या नगरसेवकांच्या बॉडी लँग्वेजवर टीका केली. तर उपमहापौर संजय घाडी यांनी लोकशाहीला साजेशी भूमिका घ्यावी, असे आवाहन करत विरोधकांवर पलटवार केला.

**मनसेची प्रतिक्रिया**

मनसेचे गटनेते यशवंत किल्लेदार यांनी सभागृहातील नियोजनावर प्रश्न उपस्थित करत २२७ नगरसेवक असूनही बसण्याची व्यवस्था का नव्हती, असा सवाल केला.

# लोकल अपघातात विद्यार्थ्यांचा दुर्दैवी अंत

## ठाणे रेल्वे प्रवासी संघटना आक्रमक



दैनिक वादळ वार्ता

**मुंबई | प्रतिनिधी**

मध्य रेल्वे मार्गावरील कळवा आणि मुंब्रा रेल्वे स्थानका दरम्यान इयत्ता १२ वीचा परीक्षार्थी सोहम कठरे (१८) याचा परीक्षा केंद्रावर जाताना प्रवासात गर्दीच्या रेट्यामुळे तोल गेल्याने मृत्यू झाला होता. या अपघातानंतर संतापलेल्या प्रवासी संघटनांनी बुधवारी काळे कपडे परिधान करत सरकारचा निषेध व्यक्त केला. तसेच ठाणे रेल्वे स्थानकाबाहेरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासमोर सोहम याला श्रद्धांजली वाहिली. सोहम हा इयत्ता १२ वीमध्ये शिकत होता. परीक्षेचा पहिला पेपर असल्याने तो परीक्षा देण्यासाठी कळवा येथील परीक्षा केंद्रावर निघाला होता. मंगळवारी सकाळी जखमी अवस्थेत कळवा आणि मुंब्रा रेल्वे स्थानका दरम्यान रेल्वे रुळांजवळ तो आढळून आला. सोहम याला पोलिसांनी ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. परंतु दाखल करण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.सोहम याचा रेल्वेच्या गर्दीमुळे तोल जाऊन मृत्यू झाल्याचा आरोप करत बुधवारी प्रवासी संघटनांनी सरकारविरोधात निषेध आंदोलन केले. प्रवासी संघटनांच्या प्रतिनिधींनी काळे कपडे परिधान करत सरकारचा निषेध केला. तसेच ठाणे रेल्वे स्थानकाबाहेरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाजवळ सोहम याला श्रद्धांजली वाहिली.


# उरणच्या युवा चित्रकाराची आंतरराष्ट्रीय भरारी

## वरद गावंड यांच्या जलरंग कलाकृतीची IWS सिंगापूर प्रदर्शनासाठी निवड

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई | प्रतिनिधी**

उरण येथील युवा चित्रकार वरद विलास गावंड यांच्या जलरंग कलाकृतीची इंटरनॅशनल वॉटरकलर सोसायटी (IWS) सिंगापूर येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धा व प्रदर्शनासाठी निवड झाली आहे. या यशामुळे रायगड जिल्ह्यातील कला क्षेत्रात गौरवाची भावना निर्माण झाली आहे.वरद गावंड हे सध्या देवरुख कॉलेज ऑफ फाईन आर्ट येथे बॅचलर ऑफ फाईन आर्ट (प्रथम वर्ष) शिक्षण घेत आहेत. त्यांनी साकारलेली द एज ऑफ द स्टॉर्म (The Edge of the Storm) ही कलाकृती ३ री खथड सिंगापूर आंतरराष्ट्रीय जलरंग स्पर्धा व प्रदर्शन २०२६ साठी निवडण्यात आली आहे.या चित्रात आकाश आणि पृथ्वी यांच्यातील नाट्यमय क्षण प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. सोनेरी पिवळा, मऊ निळा आणि अग्निमय केशरी रंगांनी सजलेले आकाश जांभळ्या व राखाडी छटांमध्ये विरघळताना दिसते. प्रकाश आणि सावलीचा खेळ चित्राला सखोल भावनिक परिणाम देतो. खालील भागात मातीचा तपकिरी रंग, पाण्यातील शांत प्रतिबिंब, लहान शिडाच्या बोटी आणि विखुरलेले पक्षी जीवन आणि हालचालीचे प्रतीक ठरतात. ही कलाकृती कागदावर जलरंग माध्यमात साकारण्यात आली आहे.वरद खुशाली विलास गावंड हे प्रामुख्याने निसर्गचित्रे, व्यक्तिचित्रे आणि लाईव्ह पेंटिंगसाठी ओळखले जातात. त्यांच्या कलाकृतींमधून निसर्गाची भव्यता आणि मानवी भावना यांचा सुरेख संगम दिसून येतो. सामाजिक जागरूकता, समानता आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांसारख्या विषयांवर ते आपल्या कलेतून भाष्य करतात.ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा व प्रदर्शन ७ ते १० जून २०२६ दरम्यान मॅकफर्सन आर्ट स्टुडिओ, सिंगापूर येथे होणार असून, कार्यक्रमाचे शीर्षक 'शालोम पीस (शांती)' असे आहे. स्पर्धेचा विषय अनिर्बंध असून, १८ वर्षांवरील कलाकारांसाठी गट ३ (उत्कृष्ट समूह) अंतर्गत ही निवड झाली आहे. या स्पर्धेसाठी अतनूर डोगान (तुर्की/कॅनडा), हॉंग शान (चीन), सुसाना सुन लियान (सिंगापूर) यांच्यासह जगभरातील नामवंत कलाकार व क्युरेटर परीक्षक म्हणून लाभले आहेत. वरद यांच्या या यशामागे देवरुख कॉलेज ऑफ फाईन आर्टचे प्राचार्य रणजीत मराठे, संस्थापक अजय पित्रे तसेच प्राध्यापक वर्गाचे मार्गदर्शन व प्रोत्साहन महत्त्वाचे ठरले आहे. कॉलेज प्रशासनाने वरद यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.यापूर्वीही वरद यांच्या कलाकृतींना राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली असून, कर्नाटक चित्रकला परिषद, बेंगळुरू येथे झालेल्या राष्ट्रीय प्रदर्शनात तसेच पुणे आर्ट फिएस्टा २०२५ या सामूहिक प्रदर्शनात त्यांच्या कलाकृतींची निवड होऊन विशेष सन्मान मिळाला आहे.





# कर्जत चौक मार्गावर एसटीची इर्टिगा गाडीला धडक

दैनिक वादळ वार्ता **मुंबई | प्रतिनिधी**

कर्जत येथून चौककडे जाणाऱ्या एर्टिगा जीप गाडीला समोरून येणाऱ्या एसटी बसने जोरदार धडक दिली. या अपघातात जीपमधील दोघे गंभीर जखमी झाले आहेत. याप्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात एसटी बसचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अपघातामुळे कर्जत-चौक रस्त्यावर बराच वेळ वाहतूक कोंडी झाली होती.वांगणी ठाणे येथील रिंकू सिंग हे आपली एमएच ०५, ईए ५७१३ ही इर्टिका जीप घेऊन कल्याण-कर्जत रस्त्याने चौककडे जात होते. साधारण पावणे बारा वाजण्याच्या सुमारास कर्जत एसटी आगाराची पनवेल येथून कर्जतकडे येणारी एम एच २० बी एल ३६२५ ही एसटी बस समोरच्या वाहनाला ओव्हरटेक करीत असताना इर्टिका गाडीवर जाऊन धडकली. हा अपघात इतका भयानक होता की, चालक रक्ताच्या थारोळ्यात पडला होता, तर बाजूला असलेली व्यक्तीही गंभीर जखमी झाली आहे. या दोघांना अडकलेल्या स्थितीतून बाहेर काढून तात्काळ डिकसळ येथील रायगड हॉस्पिटल येथे उपचारासाठी हलवले आहे.अपघातात जखमी झालेल्या दोघांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. तर या अपघातास कारणीभूत ठरलेला एसटी चालकावर कर्जत पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या अपघातामुळे कर्जत-चौक राज्यमार्ग रस्त्यावर साधारण एक तास वाहतूक कोंडी झाली होती.



# दाभड येथे भुयारी रस्त्यासाठी अर्धापूर नांदेड महामार्गावर चक्का जाम आंदोलन

दैनिक वादळ वार्ता
**अर्धापूर । प्रतिनिधी**

अर्धापूर-नदिड राष्ट्रीय महामार्गावर अपघातांची संख्या वाढली असून मागील काही दिवसांत याच राष्ट्रीय महामार्गावरील दाभड येथे वेगवेगळे अपघात होऊन तीन महिलांचा मृत्यू झाला. तरीही येथे महामार्ग प्राधिकरण प्रशासनाकडून रस्ता ओलांडण्यासाठी कसल्याही प्रकारची पर्यायी व्यवस्था करण्यात आली नाही. त्यामुळे संतप्त नागरिकांनी दि. ११ फेब्रुवारी रोजी सकाळी राष्ट्रीय महामार्गावर चक्का जाम आंदोलन केले. आंदोलनामुळे तीन-चार किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

मागील काही दिवसांपासून दाभड येथे पाच-सहा अपघात होऊन त्यात तीन महिलांचा मृत्यू झाला. या आंदोलनामुळे अर्धापूर नांदेड राष्ट्रीय महामार्गावर तीन-चार किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. अर्धापूर तालुक्यातील दाभड परिसरात गेल्या १५ दिवसांपासून शोककळा पसरली आहे. एकामागून एक अशा तीन वेगवेगळ्या अपघातात तीन महिलांच्या मृत्यूच्या घटनांनी संपूर्ण तालुका हादरला असून दि. १० फेब्रुवारी रोजी अनुसयावाई वालाजी जाधव (वय ४५) यांचा कार अपघातात दुदैवी मृत्यू झाला तर दि. २७ जानेवारी रोजी कलावतीवाई सुभाष तारडे (वय ५०) यांचा अपघाती मृत्यू झाला तर दि. २८ जानेवारी रोजी पार्वतीवाई प्रतापराव सूर्यवंशी (वय ६५) यांची निघृण हत्या झाली. या लागोपाठच्या घटनांमुळे ग्रामस्थांमध्ये प्रशासना विरोधात असंतोप निर्माण झाला आहे. अशा घटनांमुळे अधार्पूर-नदिड हा राष्ट्रीय महामार्ग मृत्यूचा सापळा वनलेला असताना प्रशासन मात्र झोपलेले आहे ? असा संतप्त सवाल आंदोलकांनी उपस्थित करून चक्का जाम आंदोलन केले आहे. अर्धापूर-नांदेड राष्ट्रीय महामार्ग ओलांडून जाण्यासाठी दाभाड शेलगांव, वामणी या तीन गावांतील अंदाजे १५ हजार लोकसंख्येच्या सुरक्षेसाठी कायमस्वरूपी भुयारी मार्ग तातडीने वांधून द्यावा. तसेच या महामार्गावर अपघात रोखण्यासाठी आवश्यक ती सिग्नल व्यवस्था सुरू करुन महामार्गावर गतिरोधक बसवावेत आणि अपघातात मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबांना शासनाकडून तातडीने आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी करून चक्का जाम आंदोलन केले. अखेर दाभड पाटीजवळ भुयारी मागार्ला मंजुरी मिळाली असून लवकरच हे काम सुरू होईल, अशी लेखी ग्वाही प्रकल्प संचालक महेश पाटील यांनी दिली






## महाशिवरात्रीपूर्वी करेंममध्ये नाग मंदिर व बसस्थानकाजवळील हातपंप सुरू; कॉ.सचिन मोतकुरवार यांच्या पाठपुराव्याला यश





दैनिक वादळ वार्ता
**सिरोंचा । प्रतिनिधी**


एटापल्ली ग्रामपंचायत गुरुपल्ली अंतर्गत कर्रेम गावातील नाग मंदिर तसेच एटापल्ली-आलापल्ली मार्गावरील बसस्थानकाजवळील नादुरुस्त हातपंपांमुळे पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली होती. अनेक वर्षांपासून बंद असलेल्या या दोन्ही सार्वजनिक हातपंपांमुळे गावकरी, भाविक आणि प्रवासी त्रस्त होते. महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर नाग मंदिरात मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी अपेक्षित असल्याने पाण्याचा प्रश्न अधिकच तीव्र झाला होता. कर्रेम गावातील नागरिकांनी एकत्र येत भाकपा जिल्हा सहसचिव कॉ. सचिन मोतकुरवार यांच्याकडे समस्या समाधानासाठी मदत मागितली. नाग मंदिर हे मुख्य मार्गावर असल्याने येथे दररोज भाविकांची वर्दळ असते, तर बसस्थानक जंगल परिसरात असल्याने बसची प्रतीक्षा करणाऱ्या प्रवाशांना पिण्याच्या पाण्याविना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते.

नागरिकांची अडचण गांभीर्याने घेत कॉ. सचिन मोतकुरवार यांनी तात्काळ शासन-प्रशासनाशी संपर्क साधत नाग मंदिर व बसस्थानकाजवळील दोन्ही हातपंप दुरुस्त करून सुरू करण्याची मागणी केली आणि सातत्याने पाठपुरावा केला. महाशिवरात्रीपूर्वीच प्रशासनाने दखल घेत दोन्ही ठिकाणचे हातपंप दुरुस्त करून कार्यान्वित केले.यामुळे महाशिवरात्रीसाठी येणाऱ्या भाविकांना तसेच बसस्थानकावर थांबणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. कर्रेम गावातील नागरिकांनी कॉ. सचिन मोतकुरवार यांचे आभार मानत, लोकांच्या मूलभूत प्रश्नांवर त्वरित कार्यवाही केल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

## मुखेड तालुक्यात भूकंपाचे सौम्य धक्के;नागरिकांनी सतर्क राहण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**मुखेड । प्रतिनिधी**

मुखेड तालुक्यातील हिब्बट, कोळगाव, धामणगाव, मोटरगा, धनज व जामखेड या गावांमधून आज दिनांक ११ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ०३:२५ मी. वाजता भूगर्भातून आवाज येऊन जमीन हादरली असल्याची माहिती ग्रामस्थांनी प्रशासनाला दिली होती त्यानुसार राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राच्या संकेतस्थळावर तपासले असता दिनांक ११ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १५२० की. वाजता या धक्क्याची नोंद झाली असून या धक्क्याची तीव्रता रिश्टर स्केलवर ३.० एवढी नोंदविण्यात आली असून याचा केंद्रबिंदु नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील खपराळ गावाजवळ असल्याचे कळते. सदर धक्का हा अतिसौम्य प्रकारचा आहे तसेच या धक्क्यामुळे कुठलीही जीवित व वित्त हानी झाली नसल्याबाबत तहसीलदार मुखेड यांनी जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्रास कळविले आहे. तरी नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क रहावे. तसेच गावात ज्या लोकांच्या घराचे छत पत्र्याचे आहे व त्यांनी पत्र्यावर आधारासाठी दगड ठेवले आहेत त्यांनी सुरक्षिततेचा भाग म्हणून त्वरित दगड काढून घ्यावेत व पत्रे बोल्ट ने फिट करून घ्यावीत. पुन्हा असा आवाज आलाच तर पटकन घराबाहेर मोकळ्या जागेत गोळा व्हावे व प्रशासनाला (०२४६२) २३५०७७ या क्रमांकावर संपर्क करून कळवावे तसेच कोणत्याही अफवांनावर विश्वास ठेवू नये असे आवाहन मा. जिल्हाधिकारी श्री राहुल कर्डिले यांनी जनतेला केले आहे.




## पात्र ekyc धारक लाडक्या बहिणींना लाभ नाही त्यांनी ३१मार्च पर्यंत दुरुस्ती करावी -माजी आ.कृष्णा गजभे

दैनिक वादळ वार्ता
**आरमोरी । प्रतिनिधी**

आरमोरी विधानसभासह संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यातील लाडकी बहीण योजना अंतर्गत ई-केवायसी प्रक्रियेदरम्यान अपुऱ्या माहितीमुळे जिल्ह्यातील हजारों महिला लाभार्थी थेट योजनेतून बाद झाल्याची गंभीर बाब समोर आली आहे. परिणामी, पात्र असूनही या महिलांना नोव्हेंबर नंतर डिसेंबरचाही हप्ता मिळाला नाही.

लाडकी बहीण ए-ज्ञूल प्रक्रिया करताना काही लाभार्थ्यांकडून चुकीचा पर्याय निवडला गेल्याने योजनेचा लाभ मिळण्यात अडचणी येत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. विशेषतः ज्या पात्र लाभार्थ्यांनी श-घधउ करूनही त्यांना अद्याप योजनेचा लाभ मिळालेला नाही, अशा सर्व बहिणींना आपली श-घधउ माहिती दुरुस्ती करण्यासाठी पुन्हा एकदा संधी देण्यात येत आहे.

मा.आ.कृष्णा गजबे यांनी आज महिला व बालकल्याण विभाग अधिकारी सौ.ज्योती कडू मॅडम यांच्याशी सविस्तर चर्चा केली.



हप्ता खात्यावर जमा न झाल्याने लाभार्थी महिलांनी महिला व बालकल्याण विभागात चौकशीसाठी धाव घेतली असता, आधार क्रमांकाच्या तपासणीत त्या अपात्र ठरल्याचे सांगण्यात येत आहे; मात्र ही चूक मुद्दाम केलेली नसून माहितीअभावी किंवा तांत्रिक कारणांमुळे झाल्याचे महिलांचे म्हणणे आहे.-मा.आ.कृष्णा गजबे

या पार्श्वभूमीवर, ऑनलाइन पोर्टलच्या माध्यमातून दिनांक ३१ मार्च २०२६ पर्यंत श-घधउ मध्ये दुरुस्ती करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सर्व पात्र लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळावा हीच बाब लक्षात घेऊन आज मा.आ.कृष्णा गजबे यांनी आज महिला व बालकल्याण विभाग अधिकारी सौ.ज्योतीताई कडू मॅडम यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. म्हणूनच, ज्या लाडक्या बहिणींच्या श-घधउ प्रक्रियेत काही चूक झाली आहे, त्यांनी मुदतीपूर्वी दुरुस्ती करून घ्यावी.

## चुलत भावाच्याच घरी चोरी करणा-या इसमास केले जेरबंद ;२२ लाख ११ हजाराचा ऐवज हस्तगत

दैनिक वादळ वार्ता
**हवेली । प्रतिनिधी**

दिनांक ०५/०२/२०२६ रोजी सकाळी ०७ वा. ते दि.०६/०२/२०२६ रोजी दुपारी ०४ :१५ वा.चे दरम्यान सर्वे नंबर ९४/बी, मुंढवा पुणे येथील फिर्यादीच्या राहत्या प्लॅटमध्ये कोणीतरी अज्ञात चोरट्याने घरफोडी चोरी करुन एकुण ३७९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व एक किलो चांदी तसेच रोख रक्कम दोन लाख रुपये असे एकुण २२,११,०००/- रु.कि.चा ऐवज चोरुन नेलेबाबत मुंढवा पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नंबर ३२/२०२६ बी. एन. एस. कलम ३०५ (ए), ३३१ (३), ३३१ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.सदर गुन्हयाचे अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुंढवा पोलीस स्टेशन यांनी स्वतः घटनास्थळी भेट देवुन, पाहणी केली असता सदरचा प्रकार हा कोणीतरी ओळखीच्या इसमाने केल्याचा संशय निर्माण झाला. त्या दृष्टीकोनातुन घटनास्थळाचे आजुबाजुचे सी.सी.टी.व्ही. फुटेज




व गोपनिय बातमीदाराच्या मार्फत सदर गुन्ह्याचा कौशल्यपुर्ण तपास करुन, फिर्यादी यांचा नातेवाईक आशुतोष अशोक कासवा, वय ३८ वर्षे, रा. सर्वेनंबर ९४/बी, मुंढवा पुणे. यास गुन्हयाच्या अनुषंगाने ताब्यात घेवुन, त्याचेकडे कसोशिने तपास करता, त्याने सदर गुन्हयाची कबुली दिली. दाखल गुन्हयातील फिर्यादी याचे चोरीस गेलेले सोन्याचे दागीने व एक किलो चांदी तसेच रोख रक्कम असा एकुण २२,११,०००/- रु.कि.चा ऐवज हस्तगत करण्यात आला.सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग श्री. मनोज पाटील, मा. पोलीस उपआयुक्त, परीमंडळ ६, श्री. राजकुमार शिंदे, मा. सहा. पोलीस आयुक्त श्री. अतुल कुमार नवगिरे यांचे मार्गदर्शनाखाली , मुंढवा पोलीस स्टेशनकडील वरीष्ठ पोलीस निरीक्षक, श्रीमती स्मिता वासनिक यांचे सुचनेप्रमाणे तपास पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक, गणेश पिंगुवाले, पोलीस उपनिरीक्षक युवराज पोमण, सहा. पोलीस फौजदार, राजु कदम, पोलीस अंमलदार शिवाजी जाधव, योगेश गायकवाड, राहुल मोरे, राहुल धोत्रे, शिवाजी धांडे अक्षय धुमाळ, स्वप्नील रासकर व योगेश राऊत यांनी केली.

# तांबरवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज पारायण सोहळ्याला सुरुवात

दैनिक वादळ वार्ता
**औसा । प्रतिनिधी**

तांबरवाडी येथील ग्रामदैवत श्री गुरु लालगिर महाराज यांच्या कृपा आशिर्वादाने तांबरवाडीत प्रति पंढरपुर प्रमाने असंख्य भाविकाच्या मांदियाळीत सप्ताहाला भक्तीमय वातावरणात सुरुवात.

औसा तालुक्यातील तांबरवाडी येथे गेल्या चौदा वर्षापासून अखंड हरिनाम सप्ताह व ग्रथराज ज्ञानेश्वरी पारायण सह सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात येते,

प्रेरणास्थान ज्ञानसिंधु ह भ प संदिपान महाराज हासेगावकर यांच्या शुभ आशीर्वादाने तांबरवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह साजरा केला जातो या सप्ताहामध्ये पहाटे राम फेरी ,काकडा ,श्री पूजन ,ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, नाम जप ,प्रवचन हरिपाठ व रात्री नामवंत अशा कीर्तनकारांच्या सुश्राव्य वाणीतून कीर्तनाचे आयोजन करण्यात येते,या सप्ताहाचे खास आकर्षण महनजे युवकांचा उल्लेखनिय सहभाग सप्ताहामध्ये पहायला मीळतो ,यावेळी श्री संत शिरोमनी मारुती महाराज कारखान्याचे मा.चेअरमन तथा विद्यमान संचालक गणपतराव बाजुळगे ,मा.मजुर फेडरेशनचे अध्यक्ष सुग्रिव लोंढे,औसा पंचायत समिती सदस्य तथा उपसरपंच राम बिराजदार ,सरपंच राधाकृष्ण जाधव ,जिवन हरिश्चंद्र पाटील ,दिपक रावसाहेब बिराजदार ,जिवनज्योत हॉस्पीटलचे डॉ विनोदकुमार बिराजदार ,डॉ.सौ.संगिता बिराजदार ,हिराताई सागावे , निशांत पाटील ,संजय लोंढे.शैलेशदादा बाजुळगे,,विजयकुमार पाटील ,खंडु सोमवंसे ,सुरेखा माने ,तलाठी विकास बिराजदार ,राजेंद्र पाटील ,दयानंद आनसरवाडे ,राहुल जगताप ,चंद्रकांत जगताप ,विठ्ठल बाजुळगे,अभिजीत टाके,लिंबराज जगताप ,सोमनाथ बाजुळगे ,बालाजी उत्के,ज्ञानदेव जगताप रामकीसन पांचाळ ,गोविंद पांचाळ ,अभंग घोडके.मोहन धुमाळ ,विश्वनाथ जगताप ,विश्वनाथ बाजुळगे,माधव बिराजदार ,सचिन आनसरवाडे ,विजय जगताप ,ईश्वर आळंगे.शंकर आनसरवाडे ,विलास आनसरवाडे,अजित बाजुळगे ,गणेश पांचाळ ,प्रशांत बाजूळगे ,सह तांबरवाडी गावातील ग्रामस्थ व भाविक उपस्थीत होते.



# १३ फेब्रुवारी जागतिक रेडिओ दिवस

दैनिक वादळ वार्ता
**मोलगी । रवींद्र वळवी**

लहानपणी विविध भारती , बिनाका गीतमाला व आज च्या पिढीला विविध एफ.एम. स्टेशन्स द्वारे मनोरंजन करणारा.. एकमेव अद्वितीय – रेडिओ आपल्या लहानपणी रेडिओ हेच मनोरंजनाचे साधन होते. पण त्याचा उपयोग मनोरंजनापेक्षा घड्याळासारखा जास्त व्हायचा. मंगल प्रभात सुरू झाली की चला उठा आता.. वाजले किती बघा.. कामगार सभेची स्वरावली वाजली की अगं बाई.. उशीर झाला.. अजून भात व्हायचाय.. असे आवाज स्वैपाकघरातून यायचे.. वनिता मंडळ सुरू झालं की पेपर किंवा एखादं मासिक घेऊन घरातली गृहिणी जराशी कलंडत असे. मग संध्याकाळी बातम्यांच्या रूक्ष आवाजाच्या साथीने 'परवचा', रात्रीच्या 'आपली आवड'च्या संगतीने डोळे मिटायचे. जरा जास्त शौकीन असलेला माणूस रेडिओ सिलोन, बिनाका गीतमाला, विविध भारती वगैरे सापडतंय का हे खुंटय़ा पिळून पहात असत. तेव्हाचे रेडिओही आवाजापेक्षा खरखराट करणारेच बनविले जात की काय कोण जाणे. पण तरीही तो ऐकायचा.. कारण रेडिओ टाईम कळला पाहिजे. मग दूरदर्शनच्या आगमनाने रेडिओ मागे पडला. समोर चित्रं पहायला मिळत असताना आवाज नुसता कोण ऐकणार. पण आता एफएमच्या आगमनानंतर रेडिओला जरासा प्राणवायू मिळाला आहे. रेडिओचा शोध १८८५ साली माकरेनी याने लावल्याचे मानले जाते. मात्र त्या आधीपासूनच जगातल्या विविध भागांत विविध बिनतारी प्रक्षेपणाचे प्रयोग सुरू होते. रेडिओचा भारतातला इतिहास तसा जुना आहे. जगदीशचंद्र बोस यांनीही अशाच एका प्रयोगाचे प्रदर्शन कोलकात्यात १८८४ साली केले होते. पुढे या रेडिओ तंत्राचा वापर सैनिकी व इतर कामांसाठी व्हायला लागला. भारतात रेडिओची सुरुवात १९२३ साली रेडिओ क्लब इथे झाली. १९३५ च्या कायद्याने राज्य सरकारांना रेडिओ केंद्रे चालविण्याची परवानगी देण्यात आली होती. स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये सत्याग्रह, मोर्चे, निदर्शने, चोरून पत्रके छापणे आणि वाटणे याच्यासोबत चोरटे रेडिओ केंद्र चालविणे हाही एक महत्त्वाचा भाग होता. १९४२ च्या चले जाव चळवळीच्या वेळी डॉ. राममनोहर लोहिया यांनी तीन महिने चोरटे रेडिओ केंद्र चालविले होते. इंडियन ब्रॉडकास्टींग कंपनीने मुंबई व कोलकात्यातल्या दोन रेडिओ स्टेशन्सच्या माध्यमातून प्रसारणाला सुरुवात केली होती. पुढे ही कंपनी दिवाळखोरीत गेली व रेडिओ प्रसारण सरकारने आपल्या ताब्यात घेतले. १९३६ साली त्याला 'ऑल इंडिया रेडिओ' हे नाव मिळाले. भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावर्षी भारतात केवळ सहाच रेडिओ स्टेशन्स होती. 'ऑल इंडिया रेडिओ'ला 'आकाशवाणी' हे नाव म्हैसूरच्या एम. व्ही. गोपालस्वामी यांनी दिले. स्वातंत्र्यानंतर भारतात




रेडिओची मोठी भरभराट झाली. विविध भारतीने रेडिओवरच्या मनोरंजनाला एक वेगळी उंची बहाल केली. 'हवामहल', 'सितारों की महफिल' एकाहून एक सरस गाणी, कार्यक्रम, शास्त्रीय संगीत यामुळे 'आकाशवाणी' अल्पावधीतच लोकप्रिय झाली. टीव्हीच्या आगमनानंतर आकाशवाणीची पीछेहाट सुरू झाली. १९८२ साली भारतात रंगीत दूरचित्रवाणी संच आले व रेडिओ मागे पडला. रेडिओतल्या बदलाबरोबरच रेडिओ संचातही अनेक बदल झाले. सुरुवातीच्या काळात केवळ काही नळ्या व वायरच्या माध्यमांतून हे रेडिओ सेट तयार केले जात असत. पुढे लाकडाच्या कॅबिनेटच्या आकाराचे रेडिओ सेट आले. बॅकेलाइट म्हणजे सुरुवातीच्या काळातल्या प्लॅस्टिकचा शोध लागल्यानंतर मग रेडिओ तयार करण्यात त्याचा वापर होऊ लागला. १९५० नंतर प्लॅस्टिकचा वापर करून वेगवेगळ्या रंगांचे रेडिओ संच तयार करायला सुरुवात झाली. १९५४ साली लहान रेडिओ संचाचा म्हणजे ट्रान्झिस्टरचा उदय झाला. हे ट्रान्झिस्टर फारच महाग असत. त्यानंतर मात्र अगदी वेगवेगळ्या पद्धतीचे लहान-मोठे रेडिओ तयार होत गेले. लहान आकाराचे रेडिओ मोठय़ा प्रमाणात क्रिकेटचे धावते वर्णन ऐकायला वापरले जाऊ लागले. त्यानंतर केवळ हेडफोनच्या आकाराचे रेडिओ आले. चीनी बनावटीचे आयपॉडच्या आकाराचे रेडिओही आले. सध्या मोबाइलमध्ये उपलब्ध असलेल्या रेडिओंमुळे एक नवीनच क्रांती झाली आहे. १९७७ साली भारतात एफएम रेडिओचे तंत्रज्ञान आले व आकाशवाणीची लोकप्रियता पुन्हा वाढू लागली. सध्या आकाशवाणीच्या अनेक रेडिओ स्टेशन्सबरोबरच खाजगी रेडिओ वाहिन्याही आपल्या कार्यक्रमाचे प्रसारण करत आहेत. खाजगी एफएम वाहिन्यांची सुरुवात १९७७ साली मद्रासपासून झाली. त्यानंतर गोवा राज्यात काही खाजगी रेडिओ वाहिन्यांना परवाने मिळाले. सध्या भारतातल्या ७२ शहरांमध्ये खाजगी एफएम वाहिन्या कार्यरत आहेत. भारतात रेडिओ स्टेशन्स दोन पातळीवर चालतात. आकाशवाणीकडे मनोरंजन कार्यक्रम व वृत्तविषयक कार्यक्रम असे दोन भाग आहेत. तर खाजगी वाहिन्या केवळ मनोरंजनाचेच कार्यक्रम प्रसारित करतात. त्यांना सरकारने अद्याप बातम्या प्रसारित करण्याचे अधिकार दिले नाहीत. त्यांना केवळ आकाशवाणीच्या बातम्या पुन:प्रसारित करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. आकाशवाणीच्या एफएम रेन्बो व गोल्ड या माध्यमातून प्रसारण केले जाते. आकाशवाणीचा वृत्तविभाग हा बातम्यांच्या क्षेत्रातला अग्रेसर विभाग समजण्यात येतो. बातम्यांची सत्यता हे त्यांचे शक्तिस्थळ बनून राहिले आहे. आकाशवाणीच्या मनोरंजनाचा भर हा अधिक प्रमाणात केवळ गाण्यांवर असतो. तरीही श्रुतिका, नभोनाटय, विविध चर्चा, क्रीडाविषयक कार्यक्रम, धावते समालोचन याद्वारेही श्रोत्यांचे मनोरंजन केले जाते. फोन इन सारख्या कार्यक्रमांमुळे आता श्रोत्यांचा सहभागही वाढला आहे. खाजगी वाहिन्याही गीतांबरोबरच इतर कार्यक्रमांच्या माध्यमातून आपल्या श्रोत्यांच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करत असतात. त्यातही शहरातल्या ट्रॅफिकची माहिती देणे, काही स्वयंसेवी संस्थांच्या कार्याविषयीची माहिती देणे अशा माध्यमातून ते आपला व्यवसाय जपत असलेले दिसतात. महाराष्ट्रात मुंबई-पुण्याबरोबरच इतर ठिकाणी खाजगी वाहिन्या चांगलीच लोकप्रियता मिळवत आहेत. स्थानिक कार्यक्रम व त्या त्या भागात वापरण्यात येणा-या विविध उत्पादनांसाठीच्या जाहिराती, शेतीविषयक उत्पादनांच्या जाहिरातींचाही समावेश आहे. आज ही रेडिओ हे प्रभावी माध्यम समजले जाते.

## हनुमान मंदिर कलशारोहण सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण

दैनिक वादळ वार्ता
**नायगांव । हानुमंत चंदनकर**

सर्व भाविक भक्ताना कळविण्यात येते की नायगांव तालुक्यातील मुस्तापूर येथे हनुमान मंदिर कलशारोहण सोहळा श्री १०८ डॉ विरूपाक्ष शिवाचार्य महाराज गणाचार्य मंठ संस्थान मुखेड महंत श्री आनंदपुरी महाराज मंठ संस्थान चोळाखा यांच्या शुभहस्ते कलशारोहण सोहळा संपन्न होणार आहे हनुमान मंदिर कलशारोहण सोहळ्यानिमित्त दिनांक १३ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी रोजी अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजित करण्यात आला आहे सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रम पाहाटे ४ ते ६ काकडा ६ ते ८ रुद्राभिषेक पूजा,८ ते १० ज्ञानेश्वरी पारायण ११ ते १२ गाथा



भजन दुपारी दोन ते चार प्रवचन ४ ते ६ हरिपाठ रात्री हरिकिर्तन व हरिजागर.सप्ताहतील नामवंत किर्तनकार १३ फेब्रुवारी ह भ प माधव महाराज पांगरीकर,१४ संतोष कुशावाडीकर,१५ हनमंत महाराज किन्नीकर १६ योगेश महाराज आग्रावाल,१७ चंद्रकांत महाराज लाटकर,१८ बाबू महाराज काकाडीकर,१९ फेब्रुवारी महंत श्री संतोष पुरी महाराज २० फेब्रुवारी सकाळी ९ वाजता काल्याचे कीर्तन महाराष्ट्रातील नामवंत भागवत कथाकार डॉ दिगांबर महाराज गडगेकर हनुमान मंदिर कलशारोहण सोहळा श्री १०८ डॉ विरूपाक्ष शिवाचार्य महाराज गणाचार्य मंठ संस्थान मुखेड महंत श्री आनंदपुरी महाराज मंठ संस्थान चोळाखा यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे व भव्य महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे तरी परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळ मुस्तापूर ता नायगांव जि नांदेड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पंडित दीनदयाल उपाध्याय यांचा बलिदान दिवस बारूळ येथे साजरा

दैनिक वादळ वार्ता
**कंधार । प्रतिनिधी**

राष्ट्रासाठी पूर्णतः समर्पित असलेल्या पंडित दीनदयाल उपाध्याय यांचा बलिदान दिवस' समर्पण दिवस 'म्हणून दिनांक ११ फेब्रुवारी २०२६ रोजी जुनी ग्रामपंचायत बारूळ तालुका कंधार येथे साजरा करण्यात आला. . पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेस सूर्यकांत स्वामी यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. राष्ट्राची प्रगती ही . वरच्या स्तरावर मोजली जाऊ नये तर सर्वात दुर्बल व्यक्ती पर्यंत पोहोचलेला न्याय व संधी मोजली जावी असा विचार ते सातत्याने मांडत होते. अंत्योदय घटकांचा विकास झाला तरच राष्ट्र घडेल असे त्यांनी गणित मांडले त्याच धर्तीवर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी



शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवणे हा संकल्प करून अनेक योजनेच्या माध्यमातून समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातूनच सर्वांसाठी शौचालय, जनधन योजना, ५४ कोटी जनतेला बँकिंग क्षेत्राशी जोडणे, गरीब कुटुंबांना घरे ,अनुदान थेट बँक खात्यात ,विमा पेन्शन योजना, डिजिटल व्यवहार, स्वच्छता ,अन्नसुरक्षा ,आरोग्य संरक्षण ,महिलांचे सक्षमीकरण, स्वदेशी, राष्ट्रधर्म यासारख्या योजना प्रभावीपणे राबवणे सुरू आहेत.

यावेळी माझी जिल्हा परिषद सदस्य धोंडीराम बोडेलवार, सरपंच जनाबाई वाघमारे, सेवानिवृत्त कृषी अधिकारी शिवाजी राचेवाड ,युवा कार्यकर्ते उदय पाटील जाधव, शिवलिंग स्वामी, माजी उपसरपंच जयराम अमृता कांबळे, शंकर शिंदे, राम जाधव ,संभाजी पाटील कवठेकर ,मारुती पाटील गायकवाड ,एसपी जाधव, माधव वडजे, विलास पाटील डिकळे, सूर्यकांत स्वामी, शंकर इंगळे ,दिलीप मजरे आधी उपस्थित होते.

## तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाइनचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा जल्लोषात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड येथील वार्षिक स्नेहसंमेलन बुधवार, दि. ११ रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात अत्यंत दिमाखात आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या सोहळ्याचे उद्घाटन के.एस.के. महाविद्यालयातील नाट्यशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रो.डॉ. दुष्यांता रामटेके यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुलसी महिला मंडळाच्या अध्यक्षा मा. दीपा रोडे होत्या. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून अभिनेते डॉ.ड.महेश वनवे, सुप्रसिद्ध पॅथॉलॉजिस्ट डॉ.रेश्मा गवते, त्वचारोग तज्ज्ञ डॉ. सोनल घनघाव, प्रा.अर्जुन राठोड, डॉ.सुनिल जोंधळे, प्रा.डी.जी. निकाळजे, डॉ. विजयकुमार बांदल, प्रा.डी.डी. राऊत, प्रा.प्रकाश ढोकणे आणि प्राचार्य डॉ.अश्विनी बेद्रे यांची उपस्थिती होती.उद्घाटनपर भाषणात डॉ. दुष्यांता रामटेके यांनी, फॅशन ही केवळ बाह्य सौंदर्य नसून आत्मविश्वास, संवेदनशीलता आणि सामाजिक भान जपणारी असावी, असे स्पष्ट केले. अभिनेते डॉ.ड.महेश वनवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सूक्ष्म निरीक्षण व परिपूर्णतेचा ध्यास घेण्याचे आवाहन केले. निरीक्षण क्षमतेमुळे व्यक्तिमत्त्वाला वेगळी ओळख मिळून यशस्वी करिअर घडते, असे त्यांनी नमूद




केले. प्रास्ताविकपर भाषणात प्राचार्य डॉ. अश्विनी बेद्रे यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक तसेच सांस्कृतिक प्रगतीचा सविस्तर आढावा उपस्थितांसमोर मांडला.स्नेहसंमेलनादरम्यान विद्यार्थिनींनी आपल्या कलागुणांचे प्रभावी प्रदर्शन केले. महाराष्ट्राच्या लोककलेचा वारसा जपणारी लावणी, पोवाडा आणि विविध नृत्यांनी उपस्थितांची भरभरून दाद मिळवली. विशेष म्हणजे, विद्यार्थिनींनी स्वतः तयार केलेल्या नाविन्यपूर्ण पेहरावांचे यावेळी विशेष आकर्षण ठरले. पारंपरिक नृत्यांपासून ते आधुनिक गाण्यांपर्यंतच्या सर्व सादरीकरणांना प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. गायन सादरीकरणाने प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले, तर सामूहिक नृत्यांनी कार्यक्रमात उत्साहाची लहर निर्माण केली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पल्लवी पवार आणि आदित्य ठोंबरे यांनी केले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. आभार प्रदर्शनाने या दिमाखदार सोहळ्याची सांगता झाली.

## माहिती अधिकार सुनावणीस अर्जदार हजर प्रथम आपलीय अधिकारी गैरहजर

दैनिक वादळ वार्ता
**कंधार । प्रतिनिधी**

माहिती अधिकारांन्वये मागितलेली माहिती न मिळाल्याने कंधार तालुक्याचे तहसीलदार तथा आपीली अधिकारी यांच्याकडे अपील दाखल करण्यात आले. त्यांची सुनावणी १० फेब्रुवारी २०२६ रोजी ठेवून अर्जदारास उपस्तीत राहण्याचे कळविण्यात आले मात्र स्वतः अपिलीय अधिकारीच गैरहजर राहिल्याने त्यांनी विभागीय आयुक्त यांच्याकडे कारवाईसाठी तक्रार दाखल केली आहे तहसील कार्यालयातील पुरवठा विभागातील दक्षता समितीच्या घेण्यात आलेल्या संपूर्ण बैठकीत झालेल्या कामाची माहिती अर्जदार व्यंकट जाधव यांनी अधिकारी नायब तहसीलदार पुरवठा यांनी माहिती दिली नाही यावर



अर्जदार व्यंकट जाधव यांनी झालेल्या कामाच्या गैरव्यवहार उघडकिस आणण्यासाठी दिशाभूल केलेल्या नायब तहसीलदार यांच्या विरोधात कंधार चे तहसीलदार यांच्याकडे अपील दाखल केले यावर तहसील कार्यालयने १० फेब्रुवारी रोजी सुनावणी ठेवून अर्जदारास उपस्थित राहण्याचे आदेश दिले. अर्जदार हा गरीब शेतकरी. सामाजिक कार्यकर्ता असल्याने आर्थिक दृष्ट्या कमकुवत आहे. आपली रोजंदारी बुडून तो सुनावणीसाठी हजर राहिला मात्र सुनावणी घेणारे तहसीलदारच गैर हजर राहिल्याने त्यांचा हिरमुस झाला . नाराज झालेल्या व्यंकट जाधव यांनी विभागीय आयुक्त यांच्याकडे केलेल्या तक्रारीत आपले नाहक छळ झाल्यांचे निवेदनात म्हटले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांचे जागतिक वारसा प्रमाणपत्र युनोस्कोकडून मंत्री आशिष शेलार यांनी स्विकारले

## युनेस्को मुख्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला केले अभिवादन

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

: छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत स्थान दिले आहे. त्यासंदर्भातील युनेस्कोचे अधिकृत प्रमाणपत्र आज राज्याचे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ड. आशिष शेलार यांनी युनोस्कोच्या फ्रान्स येथील कार्यालयात जाऊन स्विकारले. युनेस्को मुख्यालयामध्ये महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे उभारण्यात आलेल्या भारतरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळ्यास आज मंत्री ड.शेलार यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादनही केले.सुमारे दीड वर्षांच्या प्रदीर्घ प्रक्रियेनंतर गतवर्षी ११ जुलै २०२५ रोजी, युनेस्कोच्या ४७व्या अधिवेशनात, 'मराठा मिलिटरी लँडस्केप्स ऑफ इंडिया' या नावाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील १२ किल्ल्यांना जागतिक वारसा यादीत स्थान देण्यात आले. या मानांकनाचे अधिकृत प्रमाणपत्र महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री ड. शेलार







यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पॅरिस येथे स्वीकारले.छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय आक्रमणाशी लढून उभारलेल्या हिंदवी स्वराज्याचे रक्षण, सुरक्षित शासनव्यवस्था आणि लोककल्याण, यासाठी साकारलेली गड-किल्ल्यांची साखळी हा भारतीय इतिहासातील अद्वितीय लष्करी व राज्यकारभाराचा नमुना मानला जातो. रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी आणि तामिळनाडूमधील जिंजी असा १२ किल्ल्यांचा समूह आज जागतिक वारसा स्थळ म्हणून संपूर्ण जगासमोर उभा राहिला आहे. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर फेब्रुवारी २०२५ मध्ये ड. शेलार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र सरकारचे चार सदस्यीय प्रतिनिधीमंडळ पॅरिसमध्ये युनेस्कोसमोर तांत्रिक आणि धोरणात्मक मांडणी करून या मानांकनासाठी सादरीकरण आणि युक्तीवाद करून आले होते. आता प्रत्यक्ष मानांकन-पत्र मिळाले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पराक्रमाचा आणि मराठा साम्राज्याच्या वारशाचा जागतिक सन्मान स्विकारताना आज ऊर भरून आला आहे. या संपूर्ण प्रक्रियेत पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेले मार्गदर्शन आणि परिश्रम तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या योगदानाबद्दल मंत्री शेलार यांनी आभार मानले आहेत. भारताचे युनेस्कोमधील स्थायी प्रतिनिधी विशाल शर्मा यांनीही परिश्रमपूर्वक केलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांचेही तमाम महाराष्ट्रातर्फे मंत्री ड.शेलार यांनी आभार मानले. तसेच हा महाराष्ट्रासाठी, देशासाठी शिवप्रेमींनसाठी गौरवाचा क्षण असल्याचे ही त्यांनी म्हटले आहे.दरम्यान, भारताचे संविधानाला ७५ वर्ष पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धपुतळा युनेस्को मुख्यालयाला भेट दिला असून, दि.२६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिनानिमित्त या पुतळ्याची स्थापना पॅरिसमध्ये युनेस्को मुख्यालयात झाली आहे. सामाजिक न्याय, समानता, बंधुता आणि शिक्षणाद्वारे सक्षमीकरण यांची डॉ. आंबेडकरांनी दिलेली शिकवण ही युनेस्कोच्या मुलभूत ध्येयाशी सुसंगत आहे. पॅरीसमधील त्यांच्या या स्मारकाला आज मंत्री शेलार यांनी अभिवादन केले. यावेळी विशाल शर्मा यांच्यासह विभागाचे डॉ.सचिव किरण कुलकर्णी, पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक हेमंत दळवी आणि मान्यवर उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077